**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ
अकोला

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 28-03-2025**

**बुलढाणा(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-03-28 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-03-29 | 2025-03-30 | 2025-03-31 | 2025-04-01 | 2025-04-02 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 38.5 | 39.4 | 39.6 | 36.4 | 37.5 |
| किमान तापमान (अं.से) | 25.6 | 26.5 | 28.5 | 29.1 | 29.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 45 | 36 | 41 | 55 | 65 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 22 | 20 | 27 | 40 | 38 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11 | 11 | 11 | 11 | 18 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 320 | 180 | 230 | 270 | 140 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 0 | 0 | 1 | 2 | 2 |
| चेतावणी | कोई चेतावनी नहीं | कोई चेतावनी नहीं | कोई चेतावनी नहीं | कोई चेतावनी नहीं | कोई चेतावनी नहीं |

## भविष्यवाणी सारांश:

भारतीय हवामान खात्याने आज वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात दि. २८ मार्च ते ०१ एप्रिल दरम्यान कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

येत्या पाच दिवसांसाठी कोणत्याही प्रकारचा इशारा नाही .

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

हवामानाचा कुठल्याही प्रकारचा इशारा नसल्याने शेतीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाही.

## कृषि सल्ला:

जिल्ह्यातील सध्याचा कमाल तापमानाचा पारा वाढत असल्याने पिकांवर, फळबागांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. परिणामी पिकांची, फळबागांची वाढ खुंटणे, फळगळ होणे, फळे काळी पडणे अशी लक्षणे दिसू लागतात. म्हणून यावर उपाय म्हणून पिकांना वा फळबागांना प्राधान्याने ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळेत करावे.उन्हाळ्यात भूजल पातळी खालावते म्हणून शेतकऱ्यांनी पिकांना ओलीत करतेवेळी पाण्याचा अपव्यय होणार नाही अशा पद्धतीने पाणी द्यावे. पिकाला/भाजीपाला पिकांना/फळबागांना ओलीत करताना प्राधान्याने ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीने ओलीत करावे, ज्यामुळे पाण्याची बचत होण्यास मदत होईल.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| कापणी केलेल्या धान्याला उन्हात वाळवून घ्यावे जेणेकरून ते दिर्घकाळ साठवणीयोग्य राहील आणि त्यावर किडींचा प्रादुर्भाव होणार नाही. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | सध्याच्या हवामान परिस्थितीनुसार उन्हाळी भुईमुगाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत शक्यतो तुषार सिंचन पद्धतीने करावे. ओलीत करताना पिकाची पाण्याबद्दलची गरज व मातीचा प्रकार लक्षात घ्यावे. |
| सूर्यफूल | उन्हाळी सूर्यफुलामध्ये तुडतुडे/फुलकिडे यांचा प्रादुर्भाव आढळून आल्यास इमीडाक्लोप्रिड १७.८%एस.एल. या कीटकनाशकाची २.० मिली/१० ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. सध्याचे वाढलेले तापमान लक्षात घेता बाष्पीभवनाचा वेग वाढलेला आहे त्यामुळे पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने शक्यतो सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळेत ओलीत करावे. |
| गहू | जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी गव्हाचे पिक परिपक्व झाले असून त्याची कापणी झालेली आहे. कापणी केलेल्या गव्हाची मळणी करून तयार झालेला शेतमाल सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कागदी लिंबू | कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास लिंबू झाडांची वाढ कमी व्हायला सुरवात होते. म्हणून ठिबक सिंचनाने ४ ते ५ दिवसांच्या अंतराने लिंबू बागेला ओलीत करावे. |
| केळी | वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवन व पर्णोत्सरण या दोन्ही क्रियांचा वेग वाढतो व परिणामी पाण्याचे अधिक प्रमाणात वहन होते. म्हणून केळीच्या बागेला आवश्यकतेनुसार नियमितपणे ओलीत करावे. |
| वांगे | सध्याच्या वाढत्या तापमानापासून संरक्षण करण्यासाठी वांगी पिकला सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळी ओलीत करावे. पिकांच्या वाढीच्या संवेदनशील अवस्थांमध्ये नियमितपणे ओलीत करावे. |
| मिरची | सध्याच्या वाढत्या तापमानापासून संरक्षण करण्यासाठी मिरची पिकाला सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळी ओलीत करावे. पिकांच्या वाढीच्या संवेदनशील अवस्थांमध्ये नियमितपणे ओलीत करावे. |
| पेरू | उन्हाळ्यातील ३७.० अंश सेल्सिअस पेक्षा जास्त असलेले कमाल तापमान व कमी झालेली आर्द्रता पेरू फळबागेतील फळधारणा योग्य रीतीने होण्यास बाधक ठरते व त्यामुळे फळगळ होऊन एकंदरीत उत्पादनात घट येऊ शकते. म्हणून उच्च तापमानापासून संरक्षण म्हणून फळबागेत सेंद्रिय आच्छादनांचा वापर करावा. |
| संत्रा | संत्रा बागेला वाढत्या तापमानात फळगळीमुळे नुकसान पोहोचू नये म्हणून पाणी द्यावे. पानातील अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी १३:००:४५ ची १५ ग्रॅम + चीलेटेड झिंक ५ ग्रॅम /लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| कांदा | सध्याच्या वाढत्या तापमानाची कक्षा लक्षात घेऊन कांदा पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे तसेच ओलीत करतेवेळी ते प्राधान्याने सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेत करावे. |
| टरबूज | परिपक्व झालेली टरबूजाची फळे तोडून घेऊन सावलीत ठेवावी व त्यातली किडग्रस्त ,सडकी फळे वेगळी काढून चांगली फळे बाजारपेठेत नेण्याची व्यवस्था करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | जनावरांना वाढत्या तापमानाचा त्रास होऊ नये म्हणून पिण्यासाठी थंड,स्वच्छ,पुरेसे पाणी आणि पुरेसा चारा उपलब्ध करून द्यावा.तसेच त्यांना सावलीत ठेवावे. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | वातावरणातील उष्णतेपासून पक्ष्यांचे संरक्षण करण्यासाठी शेडच्या छताला वरून व भिंतीला बाहेरून चुना किंवा पांढरा रंग लावावा. तसेच शेडमध्ये हवा खेळती व थंड राहण्यासाठी पंखे किंवा कुलरचा वापर करावा. |

## हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

| |
|---|
| येत्या पाच दिवसांसाठी कोणत्याही प्रकारचा इशारा नाही . |

## परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

| |
|---|
| हवामानाचा कुठल्याही प्रकारचा इशारा नसल्याने शेतीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाही. |

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**